# देगलूर महाविद्यालयात प्रश्नोत्तर माध्यमातून स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन

## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचा उपक्रम






**उर्जा वृत्तसेवा**

देगलूर - येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर म हाविद्यालय देगलूर मधील इयत्ता अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना प्रा.कपिल तोटावार यांनी प्रश्नोत्तरातूनसाम ान्य ज्ञान विषयावर मार्गदर्शन केले.१८ सप्टेबंर रोजी देगलूर महाविद्यालयात कनिष्ठ विभागातील स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

आजच्या या मार्गदर्शन सत्रासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून रसायनशास्त्र विभागाचे प्रा. कपिल तोटावार होते.

यांनी विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान या विषयी माहिती दिली. यामध्ये त्यांनी जवळपास सर्वच विषयांच्यासंदर्भात प्रश्न विचारून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण केली.

ज्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना आली नाहीत अशा सर्व प्रश्नांचे विश्लेषणासहित उत्तरे विद्यार्थ्यांना प्रा.तोटावार यांनी समजावून सांगितली. विद्यार्थ्यांनी प्रश्नांची उत्तरे आपल्या वही मध्ये लिहून घेतली.

यानतंर पंचवार्षिक योजना, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, विमानतळावर प्रश्न घेतले, भारतीय न्यायव्यवस्था, राज्यघटनेतील विविध कलम, भारतातील पहिली डॉ. महिला, राष्ट्रपती कोण, महान्यायवादी कोण, भारतातील विविध स्त्री, सुधारक कोण आहेत आणि त्यांची कार्ये कोणती आहेत तसेच विज्ञान विषयातील विविध संकल्पना स्पष्ट केल्या. रसायनशास्त्र विषयातील विविध प्रकारचे रसायन आणि रासायनिक प्रक्रिया कशा घडून येतात त्यांची सूत्रे कोणती आहेत या विषयी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन सत्र कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक प्रा.एस. एन. पाटील होते यावेळी प्रा महेश कुलकर्णी प्रा.शेरीकर व्हि.जी.प्रा.बाळासाहेब नागरगोजे, प्रा वानोळे संतोष, प्रा.हणमंत वाकडे, प्रा भुरे आदी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.धनराज लझडे तर आभार प्रा.सौ. अनिता देबडवार यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner